# महाराष्ट्र शासन


**विभागीय सहसंचालक, उच्च, शिक्षण, कोकण विभाग, पनवेल**

**शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसर, पनवेल, जि.रायगड - ४१० २०६.**

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com    दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२) २७४५३८२०.


क्र. विससं/उशि/कोविप/भ.नि.नि./२०२०/ 628    दिनांक : २३/०६/२०२०

प्रति,

प्राचार्य,

सर्व अधिनस्थ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य,

विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय

जि. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग

विषय :- **भविष्य निर्वाह निधी मधून परतावा, ना-परतावा, अंतिम रक्कम मिळणेबाबत...**

उपरोक्त विषयाबाबत विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल कार्यालयाच्य अधिनस्थ असलेल्या अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालय यांना कळविण्यात येते की, भविष्य निर्वाह निधी मधून अग्रीम परतावा, ना-परतावा व अंतिम रक्कम मिळणेबाबतचे प्रस्ताव प्रस्तूत कार्यालयास सादर करण्यात येतात. पंरतु सद्यास्थितीत **वितरण व संनियंत्रण प्रणाली (बिम्स) मध्ये (Authorization restricted by finance department) असा संदेश येत असल्यामुळे देयक प्राधिकारपत्र (BDS) तयार होत नाही.** त्यामुळे सदरचे देयक कोषागार कार्यालयात सादर करता येत नाही. त्यामुळे भविष्य निर्वाह निधी मधून परतावा, ना-परतावा अग्रीम व अंतिम रक्कम प्रदान करण्यासाठी तांत्रिक अडचण असल्यामुळे सदरचे प्रस्ताव या कार्यालयाकडून पारित करता येणे शक्य नाही. त्यामुळे या पुढे परतावा, ना-परतावा अग्रीम व अंतिम रक्कम मिळणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात येऊ नये. या पुर्वी सादर करण्यात आलेले प्रस्ताव परत करण्यात येत आहेत. व या बाबत त्रुटी पुर्ववत झाल्यानंतर सदर प्रकरणावर योग्यती कार्यवाही करण्याबाबत आपणास कळविण्यात येईल.

**विभागीय सहसंचालक**

**उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल**

Scanned by CamScanner